## द्राक्ष बागायतदारांसाठी महत्वाचे मुद्दे

### मण्यांची शुष्कता कमी करणे

**काय करावे**

१. ७५ ते १०५ दिवसांच्या दरम्यान एकदाच कॅल्शियम नायट्रेट किंवा कॅल्शियम क्लोराईडच्या द्रावणात घड बुडवावेत.

२. वेलीवरील पानांच्या संख्येनुसार घडांचे तसेच घडातील मण्यांचे नियोजन करावे.

**काय करू नये**

१. मण्यांची विरळणी करताना मण्यांना इजा करू नये.


२. मण्यावरील लव पुसू नये.

### मणीगळ थांबविण्यासाठी सजिवकांचा वापर

**काय करावे**

१. सीपीपीयू (१-२ पीपीएम) तसेच जीए (४० पीपीएम) ३-४ व ६-७ मिमी मणी अवस्था असताना डिंपीगद्वारे घडांना द्यावे त्यामुळे मण्यांच्या देठाची योग्य प्रमाणात वाढ होते.

२. काढणी आधी १० दिवस नॅपथॅलीन ॲसिटीक ॲसीड (एनएए) या सजीवकांची ५० ते १०० पीपीएम या प्रमाणात फवारणी करावी त्यामुळे मणी गळ कमी होईल



घड गाठीच्यावर तोडावा

३. द्राक्षाची काढणी करताना गाठीच्या वर तोडणी करावी.

**काय करू नये**

१. काढणी अगोदर रंगीत जातीसाठी इथ्रेलचा वापर करू नये त्याऐवजी मण्यात पाणी उतरण्याच्या वेळेस योग्य प्रमाणात (२५०-३०० पीपीएम) इथ्रेलचा वापर करावा.

### मणीगळ न होण्यासाठी इतर बाबींचे नियोजन

**काय करावे**

१) काढणीआधी द्राक्षे काढणीयोग्य आहेत की नाही याची खात्री करावी (TSS/Acid ratio = ३० असावा)

२) योग्य रंग (दुधाळ) आणि आकार असलेल्या सुटसुटीत घडांची काढणी करावी व निर्यातीसाठी पाठवावे.

३) घड काढताना देठावरील गाठीच्या वर तोडावेत.

४) सकाळचे तापमान २० अंश से. असताना काढणी करावी.

५) द्राक्षांना ६ तासाचे आत प्रि कुलींगसाठी ठेवावे.

६) शितगृहातील तापमान ० ± ०.५ अंश से. तसेच आर्दता ९५ ± २ % एवढी नेहमीसाठी ठेवावी.

७) आयातदारांना हव्या असलेल्या पॅकींगमध्ये द्राक्ष निर्यात करावीत.

**काय करू नये**

१. तापमान २० अंश से. पेक्षा जास्त असताना काढणी करू नये.

२. रात्री जास्त दव पडले असल्यास दव घडावरून निघून गेल्यानंतर काढणी करावी.

३. पाऊस पडून गेल्यानंतर ३-४ दिवसांनी काढणी करावी.

४. द्राक्षाची हाताळणी योग्य प्रकारे करावी.

५. अतिघट्ट किंवा खुप सैल घडांची निवड निर्यातीसाठी करू नये.

६. इजा झालेले किंवा डाग पडलेले मणी निर्यातीसाठी पाठवू नयेत.

७. शितगृहातील विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची काळजी घ्यावी.


विस्तार माहिती पत्रिका क्र. : 18

लेखक :
डॉ. एस. डी. रामटेके, डॉ. आर. जी. सोमकुवर आणि डॉ. पी. जी. अडसूळे

प्रकाशक :
डॉ. पी. जी. अडसुळे, संचालक
राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे - 412 307

मे : 2008

किंमत : रु. 10

अधिक माहितीकरता संपर्क :
संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे - 412 307

Printed at : Flamingo Business Systems, Tel. : 24214636. Email : flaminbs@vsnl.com




# द्राक्षाचे साठवणीतील आयुष्यमान वाढविण्यासाठी संजीवके आणि इतर बाबींचा योग्य वापर




## राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे


पो. बॉ. नं. 3, मांजरी फार्म पो. ऑ., सोलापूर रोड,
पुणे - 412 307. महाराष्ट्र, भारत

Tel. : 020-26914245 / 5573 / 5574 • Fax : 020-26914246
E-mail : nrcgrape.mah@nic.in

द्राक्षाची निर्यात करताना त्यांचा टिकाऊपणा अतिशय महत्वाचा असतो. साठवणीमध्ये जास्त दिवस टिकून राहाण्यासाठी काढणीपूर्वी करण्यात येणारा संजीवकांचा वापर महत्वाचा असतो. द्राक्ष काढणीनंतर त्याची हाताळणी, पॅकींग आणि शितगृहातील साठवण ह्या काही बाबी द्राक्षाचे साठवणीतील आयुष्यमान वाढविण्यासाठी आवश्यक असतात.

## आवश्यक घटक

१. देठाची जाडी
२. सालीची जाडी
३. मण्यातील गर
४. मण्यावरील चमक व तजेलदारपणा




योग्य जाडीचे देठ

### १. देठाची जाडी

साठवणीमध्ये मण्यांची गळ दोन प्रकारे होते.

अ) ओली गळ
ब) सुकी गळ

**अ) ओली गळ :**

ही गळ जातीनुसार होते. काही जातीमध्ये ही गळ जास्त प्रमाणात होते तर काही जातीमध्ये अजिबात गळ होत नाही. मणी गळ न होण्यासाठी देठाची मण्याशी असलेली पकड महत्वाची ठरते.

१) ही पकड मजबूत असण्यासाठी मण्यात गर व्यवस्थीत असावा लागतो.
२) द्राक्षाची पॅकींग करताना दक्षता घेणे आवश्यक आहे. यात थोड्या हालचालीमुळे मणीगळ होणार नाही म्हणून व्यवस्थीत पॅकींग करावी.
३) शितगृहातील तापमान नियंत्रित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.
४) काढणीच्या १० दिवस अगोदर एन.ए.ए. (नॅपथॅलिन ॲसिटीक ॲसिड) हे ५०-१०० पी.पी.एम. या प्रमाणात द्यावे.

**ब) सुकी गळ :**

थॉमसन सिडलेस व शरद सिडलेस या जातीमध्ये देठाची जाडी ही कमी असल्याने साठवणीत देठ लवकर सुकून मणी गळतात.

**कारणे**

१) पाण्याचा ताण किंवा तापमानातील आमुलाग्र बदल (दिवस व रात्रीचे तापमान यातील जास्त अंतर) यांचा समावेश होतो.
२) काढणीच्या कालावधीत पाण्याचा ताण जास्त दिला गेल्यास देठावर अब्सेसीक ॲसिडचे प्रमाण वाढते त्यामुळे मण्यांची देठाशी असलेली पकड कमकुवत होते व मणी गळून पडतात.
३) निर्यातीच्या द्राक्षांना प्रि कुलींग करताना जास्त कालावधी लागला किंवा जास्त तापमान असताना द्राक्षांची काढणी केली तरीसुध्दा ही गळ होवू शकते.

**उपाययोजना**

१. देठाची जाडी वाढविण्यासाठी सीपीपीयू या संजीवकांचा वापर करावा हे काम सर्वसाधारणत: दोन वेळा केले जाते (३-४ मिमी व ६-७ मिमी मणी आकार) त्यामुळे देठाची जाडी ही बऱ्यापैकी वाढते (अंदाजे १.८० ते २.१० मिमी) त्यामुळे देठ सुकण्यास वेळ लागतो व पर्यायाने मणीगळ होत नाही. (तक्ता क्र. १ पहावे)
२. काढणीच्या अगोदर वेलीला पाण्याचा ताण देऊ नये.
३. रंगीत जातीसाठी इथ्रेलचा वापर मण्यात पाणी उतरण्याच्या वेळी करावा.
४. मण्यांची संख्या नियंत्रित ठेवावी त्यामुळे देठाची जाडी वाढण्यास मदत होईल.

**टीप :** ज्या जमिनीमध्ये किंवा पाण्यात क्लोराईडचे प्रमाण जास्त आहेत अशा ठिकाणी कॅल्शियम क्लोराईड वापरू नये.

### २. सालीची जाडी

द्राक्ष मण्यांच्या सालीची जाडी जास्त असल्यास त्यामधून पाण्याचा ऱ्हास अतिशय सावकाश होत असतो व त्यामुळे मणी अधिक काळपर्यंत टिकून राहतात. फुगवणीसाठी देण्यात येणारे जीए व सीपीपीयू यांच्या वापराने सालीची जाडी वाढण्यास मदत होते. अलिकडे संजीवकांच्या अतिरेकी वापरामुळे सालीची जाडी जास्त जाड होताना दिसत आहे. अशी द्राक्ष खाताना तोंडात चोथा जास्त तयार होतो व चव ढासळते म्हणून संजीवके वापरताना ती नियंत्रित मात्रेत असतील याची खबरदारी घ्यावी. (तक्ता क्र. १)

**तक्ता क्र. १**

| अ. क्र. | संजीवके | मात्रा | मण्यांची अवस्था | कशासाठी |
|---|---|---|---|---|
| १ | एन ए. ए. नॅपथॅलीन ॲसिटीक ॲसिड | ५०-१०० पीपीएम | काढणीच्या १० दिवस आधी | द्राक्षांची ओली गळ होऊ नये |
| २ | जीए (जिबरेलिक ॲसिड) सोबत सीपीपीयू (फोर क्लोरो पायरीडील फेनिल युरिया) | जीए ४० पीपीएम आणि १ ते २ पीपीएम सीपीपीयू | ३-४ व ६-७ मि.मी. द्राक्ष मणी अवस्था | देठाची जाडी वाढविणे (सुकी गळ होऊ नये) |
| ३ | कॅल्शियम (नायट्रेट किंवा क्लोराईड) | ०.५-१.० टक्के | ७५ ते १०५ दिवस (एकदाच) | मणी तजेलदार दिसण्यासाठी |

### ३. मण्यातील गर

मण्यांचा कुरकुरीतपणा (Berry Crispness) हा मण्यातील गरावर अवलंबून असतो. द्राक्षमण्यातील गर घट्ट असल्यास त्यांचा टिकाऊपणा वाढतो. हे करण्यासाठी सोर्स - सिंक तत्वाकडे लक्ष देणे गरजेचे ठरते. यासाठी वेलीवरील पानांच्या संख्येवर द्राक्षाचे वेलीवरील घड किंवा घडातील मण्यांची संख्या ठरवावी. असे केल्याने अन्नाचे वहन योग्यरीतीने होऊन मण्यातील गर वाढण्यासोबतच मण्याचे आकारमानसुध्दा वाढते. अशाप्रकारे मण्याचे चांगले पोषण होऊन अशा मण्यांची साठवणक्षमता चांगली राहते.

### ४. मण्यावरील चमक व तजेलदारपणा

द्राक्षमणी तजेलदार दिसण्यासाठी ०.५ ते १.०% कॅल्शियम नायट्रेट किंवा क्लोराईड चा वापर डिपींगद्वारे करावा. ७५ ते १०५ दिवसादरम्यान एकदा घड वरील द्रावणात बुडवावेत. त्यामुळे द्राक्षमण्यांची साठवणक्षमता वाढते.

द्राक्षमण्यांवर मेणासारखा पांढरा पदार्थ दिसून येतो. बऱ्याचवेळा तो पेस्टीसाईडचा अवशेष आहे असा समज होतो परंतु हा पदार्थ ब्लूम (लव) असतो. यामुळे मण्यांमधील पाण्याचा अपव्यय कमी होतो व पर्यायाने मण्यांचे साठवणीतील आयुष्य वाढण्यास मदत होते म्हणून काढणी किंवा घड हाताळताना हा थर पुसला जाणार नाही याची काळजी घ्यावी.